# Article in Maharashtra Times

## Dated: 05/05/2025

**Maharashtra Times covered the Lok Kala event celebrated at R.A.Podar College of Commerce and Economics (Autonomous) on the occasion of Maharashtra Divas on 1st May 2025.**

# महाराष्ट्राच्या लोककलेची पर्वणी पोदारमध्ये




**मुंबई टाइम्स टीम**

माटुंगा येथील **पोदार कॉलेज**च्या मुद्रा मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीनं महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचं औचित्य साधून सामाजिक जाणीव निर्मितीच्या अनुषंगानं कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावर्षीच्या कार्यक्रमाची संकल्पना 'महाराष्ट्राची लोककला' अशी होती. ज्यामध्ये महाराष्ट्राच्या समृद्ध आणि विविधतेनं नटलेल्या लोककलेचा गौरव करण्यात आला.

कॉलेज Club

कार्यक्रमाचा शुभारंभ प्राचार्या डॉ. विनिता पिंपळे, उपप्राचार्य मेजर डॉ. माधव गवंदे, उपप्राचार्य कपिल देव इंदूरकर, प्रा. स्वाती बांगर-गोडे, महेश देशपांडे, संतोष पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलनानं झाला. कार्यक्रमाची सुरुवात गणेशवंदनेनं झाली. एका सामाजिक विषयावर नाटिका सादर करण्यात आली, यामध्ये मराठी संस्कृतीतील विविध लोककला जपण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमात वाघेमुरळी, लावणी, कुपारी, दशावतार यासारख्या विविध लोककलांची सादरीकरणं झाली. संगीत विभागानं सादर केलेल्या ओवी, अभंग आणि पोवाड्यांमधून महाराष्ट्राची परंपरा, इतिहास आणि गौरवगाथा सादर करण्यात आली.

'दशावतार' या पारंपरिक लोकनाट्यावर आधारित संगीत नाटिकेनं प्रेक्षकांना भावविवश केलं. यासह महाराष्ट्र दिनाचा इतिहास आणि कामगार दिनाचं महत्त्व यावरही प्रभावी भाषणं झाली, यातून विद्यार्थ्यांना या दिवसांची मूळ संकल्पना समजली. कार्यक्रमाचा शेवट एका सामजिक संदेशानं झाला. महाविद्यालयाच्या प्राचार्या. डॉ विनिता पिंपळे यांनी 'महाराष्ट्राची संस्कृती आणि लोककला जपली पाहिजे, आपल्या अस्मितेचं हे द्योतक आहे. येणाऱ्या नव्या पिढ्यांसाठी ही संजीवनी ठरेल', असा संदेश दिला. उपप्राचार्य मेजर डॉ. माधव गवंदे, उपप्राचार्य कपिल देव इंदूरकर, प्रा. स्वाती बांगर-गोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला.